जिल्हा मानव विकास समिती

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

# मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजना संदर्भात महत्वाचे शासन निर्णय

## मानव विकास कार्यक्रम अंतर्गत महत्वाचे शासन निर्णय अनुक्रमाणिका


| अ.क्र | शासन निर्णय क्रमांक | विषय | पृ क्र. |
|---|---|---|---|
| १ | माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८ दि.१९ जुलै, २०११ | मानव विकास कार्यक्रमांची व्याप्ती वाढविणे व मानव विकासावर आधारीत योजना राबविणे. | १ ते ३० |
| २ | माविमि-२०१२/प्र.क्र.६९/का.१४१८ दि.१२ जुलै, २०१२ | मानव विकास कार्यक्रमांत अंमलबजावणीच्या दृष्टीने सुधारणा करणेबाबत | ३१ ते ३५ |
| ३ | माविमि-२०१३/प्र.क्र.०४/का.१४१८ दि.२४ जुलै, २०१३ | महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमामध्ये नवीन योजनांचा समावेश करण्याबाबत. | ३६ ते ४३ |
| ४ | शासन पत्र क्र.माविका-२०१२/प्र क्र.९९/का.१४१८ दि ०३ डिसेंबर, २०१३ | मानव विकास कार्यक्रम सन २०१३-१४इयता ८वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून ५ कि.मि.अंतरापर्यंत राहणा-या गरजू मुलींना सायकलीचे वाटप करणे. | ४४ ते ४६ |
| ५ | शासन पत्र क्र.माविका-२०१२/प्र.क्र.२१/का.१४१८ दि ०३ डिसेंबर, २०१३ | मानव विकास कार्यक्रम सन २०१३-१४ आरोग्य विषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचनांबाबत. | ४७ ते ५२ |
| ६ | माविका-२०११/प्र.क्र.१०८/का.१४१८ दि.१७ फेब्रुवारी, २०१४ | मानव विकास कार्यकामंतर्गत अनु.जाती / अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला देण्यात येणा-या बुडीत मजुरीत वाढ करणेबाबत. | ५३ ते ५५ |
| ७ | माविका-२०१३/प्र.क्र.७१/का.१४१८ दि. ०१ मार्च २०१४ | मानव विकास कार्यकामंतर्गत ग्रामिण भागातील सर्वच मुर्लीना इयता १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे, या करिता गाव ते शाळा दरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देणे. या योजनेंतर्गत बसेसच्या प्रतिपूर्ती खर्चात वाढ करणेबाबत. | ५६ ते ५८ |
| ८ | माविका-२०१४/प्र.क्र. २३ /का.१४१८ दि. २९ मार्च २०१४ | [illegible] करणेबाबत. | ५९ ते ६० |
| ९ | [illegible] | मानव विकास कार्यक्रम २०१२-१३ आरोग्य विषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचनांबाबत. | ६१ |
| १० | [illegible] | मानव विकास कार्यक्रमासाठी निर्माण करण्यात आलेल्या पदांची जिल्हानिहाय पुनर्रचना करण्याबाबत. | ६२ ते ६५ |
| ११ | मृदस-२०१०/प्र.क्र. २३५/ १७ ओ/ दि. १८ जुलै, २०१४ | शासकीय मृद सर्वेक्षण व मृद चाचणी प्रयोगशाळांकडून माती /पाणी नमुने तपासणीसाठी आकारण्यात येणा-या शुल्कात सुधारणा करणेबाबत. | ६६ ते ६८ |
| १२ | माविका-२०१४/प्र.क्र. १२ /का.१४१८ दि. २१ ऑगस्ट, २०१४ | महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत गौण वनौपजांचा उपभोग घेण्यासाठीबीज भांडवल म्हणून एकवेळचे अर्थसहाय उपलब्ध करुन देण्याबाबत. | ६९ ते ७८ |
| १३ | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई यांचे पत्र क्र.राप/वाह/मावियो/८९२७ दि.३०डिसेंबर, २०१४ | ग्रामिण भागातील इयता ८ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे या करिता गाव ते शाळा दरम्याण वातुकीची सुविधा उपलब्ध करुन दणेबाबत./ मानव विकासयोजनेच्या अंमलबजावणीबाबत. | ७९ |
| १४ | माविका-२०१४/प्र.क्र. १२ /का.१४१८ दि. १ ऑगस्ट, २०१६ | महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत गौण वनौपजांचा उपभोग घेण्यासाठी बीज भांडवल म्हणून एकवेळचे अर्थसहाय उपलब्ध करुन देण्याबाबत. | ८० |
| १५ | शासन पत्र क्र.माविका-२०१७/प्र.क्र.२३/का.१४१८ दि १४ मार्च, २०१७ | सन्माननीय विधानमंडळ सदस्यांना जिल्हयातील मानव विकास कार्यक्रमाची माहिती होण्यासाठी बैठक आयोजित करण्याबाबत | ८१ |

**मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे व मानव विकासावर आधारीत योजना राबविणे.**

**महाराष्ट्र शासन ,**
**नियोजन विभाग,**
**शासन निर्णय क्र.:- माविमि -२०१०/प्र.क्र. ८१ /का.१४१८**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२.**
**दिनांक १९ जुलै, २०११**

वाचा - शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र ममावि-२००६/प्र.क्र.२०/का.१४१३,दि.२९ जून,२००६

**प्रस्तावना :-** राज्यातील १२ अतीमागास जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरीता संदर्भाधीन दि. २९ जून, २००६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली होती. आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ या बाबींशी संबंधित स्थानिक गरजेनुसार विविध योजना मिशनने आपल्या कार्यक्षेत्रामधील १२ जिल्हातील २५ तालुक्यांमध्ये राबविल्यामुळे संबंधित तालुक्यांच्या मानव विकाससंबंधीच्या अनेक निर्देशांकात लक्षणीय वाढ झालेली आहे.

२. मा.मंत्री,वित्त व नियोजन यांनी दि.२५ मार्च २०१० रोजी अर्थसंकल्पीय भाषणाच्या वेळी मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर राबवून सदर कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची घोषणा केली होती. ही बाब विचारात घेऊन मानव विकासावर आधारीत योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. या संदर्भात दि.१० मार्च, २०११ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे मा. उपमुख्यमंत्री , मा. मुख्य सचिव, सर्व संबंधित विभागांचे प्रधान सचिव / सचिव , कार्याध्यक्ष, मानव विकास मिशन , यशदा, युनिसेफ यांचे प्रतिनिधी यांचेसोबत आयोजित केलेल्या बैठकीत, प्रत्येक तालुक्यास अधिक निधी प्राप्त व्हावा व त्या निधीतून योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्यातील १२५ तालुके निवडणे योग्य होईल असे सर्वानुमते ठरले. त्यास अनुसरून सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून खालीलप्रमाणे योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :-**

४. मानव विकास कार्यक्रम राज्यातील विहित निकषानुसार निवडलेल्या तालुक्यांमध्ये सुधारित व विस्तारित स्वरूपात राबविण्यात येईल. या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील :-

i) हा कार्यक्रम "जिल्हा" ऐवजी "तालुका" हा घटक विचारात राबविण्यात येईल.

ii) मागासलेल्या तालुक्यांच्या निवडीसाठी सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण हे दोन निकष विचारात घेण्यात आलेले आहेत.

iii) वरील निकषांच्या आधारे राज्यातील अतिमागासलेल्या १२५ तालुक्यात या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. निवडण्यात आलेल्या तालुक्यांची यादी **विवरणपत्र १** मध्ये दिली आहे.

iv) वरील मुद्दा क्र.ii) मध्ये निश्चित केलेल्या निकषानुसार निवडलेल्या तालुक्यांची निवड एक वर्षाकरिता असेल. मानव विकास निर्देशांकाची निश्चिती करण्याबाबत शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. ममावि-२०११/ प्र.क्र.२१/का.१४१८, दि. १३ एप्रिल २०११ अन्वये, यशदा या संस्थेची नेमणूक केली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तालुक्यांच्या निवडीत यथोचित सुधारणा करण्यात येईल.

v) प्रत्येक वर्षी या कार्यक्रमासाठी उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन निधीचे वाटप सर्वसाधारणपणे तालुक्यांची लोकसंख्या विचारात घेवून करण्यात येईल.

vi) या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आल्यामुळे पूर्वीच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात आला असून निवडलेल्या तालुक्यांमध्ये कोणकोणत्या योजना राबवाव्यात अशा योजनांची यादी व अंमलबजावणीची पध्दत सोबतच्या **विवरणपत्र २** मध्ये दर्शविण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार योजनांची अंमलबजावणी करावी व यामध्ये काही शंका/अडचणी असल्यास त्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घ्यावे.

vii) वरील मुद्दा क्र.vi) मध्ये नमुद योजनांव्यतीरीक्त कांही योजना राबवायच्या झाल्यास, त्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना देण्यात येतील. तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन, अन्य योजनांचा समावेश करावयाचा असल्यास त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

vii) या कार्यक्रमासाठी निश्चित केलेल्या निधीतून ९५ टक्के निधी योजना राबविण्यासाठी खर्च केला जाईल व ५ टक्के निधी प्रशासकीय बाबींवर करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने, कर्मचाऱ्यांचे मानधन, वेतन व कार्यालयीन खर्च, क्षमतावृध्दी प्रशिक्षण व योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन इ.बाबी समाविष्ट राहतील.

viii) केंद्रपुरस्कृत / राज्यस्तरीय / जिल्हा योजना / मानव विकास कार्यक्रम अशा कार्यक्रमापैकी एकाच कार्यक्रमातून लाभ देण्यात यावा. असा लाभ देताना अन्य योजनांमधून लाभ देणे शक्य नसेल अशाच वेळी या कार्यक्रमातून लाभ देण्यात यावा.

**राज्यस्तरीय प्रशासन :-**

५. i) मानव विकास कार्यक्रम व मानव विकास आयुक्त कार्यालय यांचेवर नियोजन विभागाचे नियंत्रण राहिल.

ii) मानव विकास आयुक्त कार्यालय अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरिता व यासंदर्भात शासन पातळीवर धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून त्या समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| मा. मंत्री, वित्त व नियोजन | - अध्यक्ष |
| मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य | - सदस्य |
| मा. मंत्री, महिला व बालकल्याण | - सदस्य |
| मा. मंत्री, शालेय शिक्षण | - सदस्य |
| मा. मंत्री, रोजगार व स्वयंरोजगार | - सदस्य |
| मा. मंत्री, उद्योग | - सदस्य |
| मा. मंत्री, कृषी | - सदस्य |
| मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय | - सदस्य |
| मा. मंत्री, ग्रामविकास | - सदस्य |
| मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन | - सदस्य |
| मा. मुख्य सचिव | - सदस्य |
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य | - सदस्य |
| प्रधान सचिव, नियोजन | - सदस्य |
| प्रधान सचिव (वित्त) | - सदस्य |
| प्रधान सचिव, रोजगार व स्वंयरोजगार | - सदस्य |
| प्रधान सचिव, (कृषि ) कृषी व पदुम | - सदस्य |
| प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा | - सदस्य |
| प्रधान सचिव, उदयोग | - सदस्य |
| सचिव, ग्रामविकास | - सदस्य |
| सचिव, महिला व बालविकास | - सदस्य |
| आयुक्त ,मानव विकास | - सदस्य सचिव |

iii) शासनाच्या संदर्भाधीन दि.२९ जून २००६ च्या निर्णयानुसार, सुरु झालेल्या मानव विकास मिशन कार्यक्रमाचे " कार्याध्यक्ष " या पदनामास "आयुक्त, मानव विकास "असे संबोधण्यात येईल. सध्याच्या मानव विकास कार्यालयातील पदांची पुनर्रचना करुन खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

| दि.२९ जून २००६ च्या शासन निर्णयानुसार पदनाम | पदांची संख्या | सुधारीत पदनाम | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| विशेष कार्य अधिकारी (उप आयुक्त श्रेणी) | १ | उप आयुक्त (मानव विकास) तथा सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (गट अ) | १ |
| सहाय्यक आयुक्त, वर्ग -१ | १ | सहाय्यक आयुक्त मानव विकास तथा उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी सचालनालय (गट -अ) | १ |
| लेखाधिकारी, वर्ग -२ | १ | लेखाधिकारी, गट - ब, लेखा व कोषागारे संचालनालय | १ |
| लघुलेखक (इंग्रजी) | १ | सांख्यिकी सहाय्यक, अर्थ व सांख्यिकी सचालनालय | २ |
| लघुलेखक (मराठी) | १ | लघुलखक (मराठी) | १ |
| लिपक | २ | लिपक | २ |
| शिपाई | ३ | शिपाई | २ |
| एकूण | १० | एकूण | १० |

iv) वरील नियमित पदांव्यतिरिक्त कामाची व्याप्ती लक्षात घेऊन काही पदे शासनाच्या मान्यतेने कंत्राटी पध्दतीने भरता येतील.

v) कार्यान्वयीन यंत्रणा / क्षेत्रीय अधिका-याचे किंवा विभागाचे काम असमाधानकारक असल्याचा अहवाल मानव विकास आयुक्त यांचेकडून प्राप्त झाल्यास त्यौबाबत शासनाच्या संबंधित विभागाच्या सचिवांना नियोजन विभागामार्फत कळविण्यात येईल. अशा अहवालावर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहील.

vi) मानव विकास कार्यक्रमातील योजनेच्या अंमलबजावणीमधील अनियमिततेस संबंधित अंमलबजावणी यंत्रणा व पर्यायाने त्यांचा प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

**आयुक्त, मानव विकास यांचे अधिकार :-**

६. आयुक्त, मानव विकास यांचे अधिकार व जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील:-

i) मानव विकास निर्देशांकाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सनियंत्रण करणे.

ii) राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणा-या संस्थांच्या सहकार्याने मानव विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे.

iii) मानव विकास आयुक्तालयाच्या कार्यालयीन वापरासाठी जागा भाड्याने घेणे व कार्यालयीन खर्चास मान्यता देणे.

iv) मानव विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता वेगवेगळ्या विभागांच्या कार्यक्रमात काही धोरणात्मक बदल करावयाचे असल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव नियोजन विभागामार्फत संबंधित विभागास सादर करणे.

v) जिल्हा व तालुका स्तरवरील मानव विकास समित्यांच्या कामकाजाची कार्यप्रणाली निश्चित करणे.

vi) मानव विकास आयुक्तालयाकरिता पदे भरण्याची मुभा आयुक्तांना असेल. आयुक्त कार्यालयाकरिता प्रतिनियुक्तीने शासन सेवेतील अधिकारी, कर्मचारी उपलब्ध न झाल्यास, सदरची पदे निवृत्त शासकीय / निमशासकीय अधिका-यांना नियुक्त करून अथवा संबंधित जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील नोंदणीकृत पात्र उमेदवारांकडून प्रथमतः एक वर्षाकरिता कंत्राटी पध्दतीने भरणे व आवश्यकतेनुसार पुढील कालावधी वाढविणे आणि त्यांना द्यावयाचे मानधनाचे दर शासनाच्या मान्यतेने निश्चित करणे.

vii) आयुक्त, मानव विकास यांच्याकरिता एक आणि आयुक्तालयामध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कार्यालयीन वापराकरिता एक अशी दोन वाहने भाड्याने घेणे.

viii) मानव विकास निर्देशांकाशी निगडीत सर्व प्रकारच्या केंद्र व राज्य शासनाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यात प्राथम्याने करणे व अशा प्रकारची अंमलबजावणी केली जात नसेल तर संबंधित विभागास निर्देश देणे.

ix) मानव विकास आयुक्तालयाकरिता सर्व प्रकारंची यंत्रसामुग्री, फर्निचर, लेखनसाहित्य मंजूर करण्याचे आणि त्यावर येणारा खर्च मिशनला उपलब्ध होणा-या आस्थापना निधीतून करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना राहतील.

x) मानव विकास आयुक्तालयाच्या कामकाजास गती देण्याच्या दृष्टीने आयुक्त आपले काही अधिकार आयुक्तालयामधील निम्नस्तरीय अधिका-यांना प्रदान (Delegate)करू शकतील.

xi) मानव विकास आयुक्तालय काही तालुक्यांची निवड करुन तेथे राबविण्यात आलेल्या योजनां मध्ये झालेल्या फायद्यांचे संक्षिप्त मूल्यमापन करेल.

xii) आवश्कता भासल्यास मानव विकास आयुक्तालय जिल्हा आणि तालुका स्तरावरील राबविलेल्या योजनांची तपासणी व लेखा परिक्षण करतील.

**मिशनचे आयुक्तांचा दर्जा व मानधन :-**

७. मानव विकास आयुक्त हे शासनाने नियुक्त केलेले, शासन किंवा शासन सेवेतून निवृत्त झालेले सचिव श्रेणीतील किंवा तत्सम अधिकारी असतील. शासन सेवेतून निवृत्त झालेल्या अधिका-यांची आयुक्तपदी नियुक्ती केल्यास त्यांना शासनाच्या विहित नियमानुसार मानधन देण्यात येईल.

**जिल्हा प्रशासन :-**

८. i) कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी हे 'नियंत्रक' अधिकारी म्हणून काम पाहतील.

ii) कामाची अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती राहिल :

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) | - सह अध्यक्ष |
| संबंधित विभागांचे जिल्हा प्रमुख | - सदस्य |
| जिल्हा परिषदे अंतर्गत जिल्हा परिषदेने नामनियुक्त केलेला एक सभापती | - सदस्य |
| अशासकीय सेवाभावी संस्था (एक) | - सदस्य |
| अग्रणी बँकेचे अधिकारी | - सदस्य |
| जिल्हा नियोजन अधिकारी | - सदस्य सचिव |

iii) मानव विकास कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी स्तरावर अतिरिक्त कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन संदर्भाधीन शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या पदांची पुनर्रचना करुन, संबंधित जिल्हयांत खालीलप्रमाणे नविन पदे निर्माण करण्यात येत आहेत :-

| | |
|---|---|
| अ) विस्तार अधिकारी (पंचायत) / सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी | - १ |
| ब) संशोधन सहाय्यक | - १ |
| क) सांख्यिकी सहाय्यक | -१ |

iv) उपरोक्त पदांसाठी नियमित कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत जिल्हाधिकारी यांनी सदरची पदे कंत्राटी पध्दतीने भरावीत. सदर पदांसाठी शैक्षणिक अर्हता समकक्ष पदाप्रमाणे राहील. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या कर्मचा-यांचे मानधन व अनुषंगिक भत्ते शासन स्तरावरून निश्चित करून कळविण्यात येईल.

v) जिल्ह्यांतर्गत गठित करण्यात आलेल्या मानव विकास समित्यांचे कार्यालयाकरिता लागणारी सर्व प्रकारची यंत्रसामुग्री, फर्निचर, लेखनसाहित्य मंजूर करण्याचे आणि त्यावर येणारा खर्च उपलब्ध होणा-या आस्थापना निधीतून करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

**तालुका प्रशासन :-**

९. i) तालुका स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहिल.

ii) कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी त्यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तालुका स्तरीय समिती राहील :-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | - अध्यक्ष |
| तहसीलदार किंवा तहसिलदारांनी नामनिर्देशित केलेला नायब तहसिलदार | - निमंत्रित सदस्य |
| बालविकास प्रकल्प अधिकारी | - सदस्य |
| गट शिक्षणाधिकारी | - सदस्य |
| तालुका आरोग्य अधिकारी | - सदस्य |
| अशासकीय सेवाभावी संस्था (एक) | - सदस्य |
| पंचायत समितीने नामनियुक्त केलेला सभासद(एक) | - सदस्य |
| विस्तार अधिकारी (पंचायत) | - सदस्य सचिव |

**तंत्र सल्लागार संस्थांची नियुक्ती व कार्ये :-**

१०. गटविकास अधिकारी स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याकरिता व्यवसायिक तज्ञांची आवश्यकता विचारात घेता, मागास क्षेत्र अनुदान निधीच्या (BRGF) धर्तीवर कंत्राटी पध्दतीने, वैयक्तिक निवडीद्वारे अथवा व्यवसायिक संस्थांमार्फत आऊटसोर्सिंग पध्दतीने सेवा उपलब्ध करून घेण्यात येईल. या योजनेअंतर्गत अभियंता, लेखापाल, संगणक माहिती नोंदणीकार, समाज प्रवर्तक इत्यादी स्वरुपाचे तंत्रज्ञ आवश्यकतेनुसार तालुका स्तरावर कंत्राटी पध्दतीने घेता येतील. जिल्ह्यातील तालुक्यांसाठी नियुक्त करावयाच्या तज्ञांची नियुक्ती व मानधन ग्राम विकास विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णयानुसार असेल.

**योजनांना /कामांना प्रशासकीय मान्यता :-**

११. योजनेच्या तपशिलामध्ये प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार नमुद करण्यात आलेले आहेत, परंतु योजनेची अंदाजपत्रकीय किंमत लक्षात घेवून रुपये ३ लाखापर्यंतच्या योजनांना/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार गटविकास अधिकारी यांना राहतील व त्यावरील रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. प्रशासकीय

मान्यता देताना गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांचे / आदेशांचे पालन करावे.

**योजनांना /कामांना तांत्रिक मान्यता :-**

१२. मानव विकास कार्यक्रमांतर्गतच्या योजना/कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार योजनेच्या माहितीमध्ये विहित केलेल्या अधिका-यांना असतील. याबाबत काही शंका असल्यास, त्यांनी त्या आयुक्त, मानव विकास यांचेमार्फत शासनाच्या निदर्शनास आणून त्यावर शासनाचे लेखी आदेश प्राप्त करून घ्यावेत.

**निविदा व खरेदी प्रक्रीया :-**

१३. i) निविदा मागविणे / स्वीकृत करणे व खरेदीबाबतचे सर्व निकष शासनाच्या संबंधित विभागाने विहित केल्याप्रमाणे राहतील.

ii) तालुक्यांकरिता खरेदी करावयाच्या शाळा बसकरिता आवश्यक असणारी निविदा प्रक्रीया शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार राज्य परिवहन महामंडळाकडून केली जाईल. यासाठी लागणा-या निधीची मागणी महामंडळाने आयुक्त, मानव विकास यांचेकडे करावी.

**वित्तीय बाबी**

१४. i) या कार्यक्रमासाठी आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी वित्तीय तरतूद नियोजन विभागाकडून करण्यात येईल.

ii) मानव विकास आयुक्तालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता शासनाकडून प्राप्त झालेला निधी " आयुक्त, मानव विकास " या नावाने राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र खाते उघडून, त्या खात्यात जमा केला जाइल. हे बॅक खाते रु.१०,०००/- पर्यंत रकमेसाठी मानव विकास आयुक्तालयाचे आयुक्त/ उपआयुक्त, मानव विकास यापैकी एकाच्या स्वाक्षरीने व त्यापेक्षा जास्त रकमेसाठी मानव विकास आयुक्तालयाचे आयुक्त/ उपआयुक्त, मानव विकास यांच्या संयुक्त स्वाक्षरीने हाताळण्यात येईल.

iii) सदर निधी शासनाकडून जिल्हाधिकारी यांना विहित पध्दतीने वितरित करण्यात येईल. त्यांनी तो संबंधित गटाविकास अधिका-यांना कामांच्या मंजूरीनुसार वितरित करावा. गटविकास अधिकारी यांनी सदरचा निधी स्वतंत्र बॅक खात्यामध्ये ठेवून संबंधित कार्यान्वयीन यंत्रणास कामाच्या / योजनांच्या प्रगतीनुसार वितरीत करावा.

ii) तालुका स्तरावरील मासिक खर्चाची विवरणपत्रे गटविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त करून ती शासनास दरमहा सादर करण्याची जबाबदारी आयुक्त, मानव विकास यांची राहील.

iii) अखर्चित निधीचे पुनर्विनियोजन करणे / समर्पित करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहिल.

१५. मानव विकास कार्यक्रमांतर्गत निधी वितरण किंवा अन्य धोरणात्मक बाबींसंदर्भातील कार्यवाही नियोजन विभागामार्फत करण्यात येईल. तथापि, वरील बाबी वगळता, विधानमंडळ विषयक सर्व बाबी, तसेच योजना राबविताना क्षेत्रीय यंत्रणांकडून यामध्ये काही अनियमितता वा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास त्या अनुषंगाने करावयाची पुढील कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागाने करावयाची आहे.

१६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. [illegible] व्यय-८, दिनांक २१ मार्च, २०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१७. हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०३२११२२४२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वाक्षरी)
[illegible]
(सीताराम कुंटे)
शासनाचे प्रधान सचिव

प्रत,
१)मा.राज्यपालांचे सचिव
२)मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री/राज्यमंत्री , यांचे खाजगी सचिव.
५)मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
८) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
९) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१०) शासनाचे मुख्य सचिव,
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
१२) महासंचालक, यशदा, पुणे
१३) सदस्य सचिव, उर्वरित [illegible] विकास मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
१४) सदस्य सचिव, [illegible] विकास मंडळ, [illegible]
१५) [illegible]

[illegible]

१६) आयुक्त ,मानव विकास आयुक्तालय,बाबा पेट्रोलपंपजवळ,अदालत रोड, औरंगाबाद
१७) विभागीय आयुक्त , (सर्व)
१८) जिल्हाधिकारी , (सर्व)
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी ,(सर्व)
२०) संचालक ,अर्थ व सांख्यिकी संचालनालय
२१) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२२) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२३) उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय,(सर्व)
२४) जिल्हा नियोजन अधिकारी ,(सर्व)
२५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
२६) संचालक, रेशीम, नागपूर
२७) संचालक, आरोग्य,
२८) संचालक, शिक्षण
२९) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
३०) आयुक्त, कृषी
३१) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, (सर्व)
३२) जिल्हा कोषागार अधिकारी ,(सर्व)
३३) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग , (सर्व)
३४)नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव
३५) निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग

## विवरणपत्र १

## मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांची यादी

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | अ.क्र. | तालुक्याचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ठाणे(८) | १ | जव्हार |
| | | २ | विक्रमगड |
| | | ३ | तलासरी |
| | | ४ | डहाणू |
| | | ५ | मोखाडा |
| | | ६ | वाडा |
| | | ७ | मुरबाड |
| | | ८ | शहापूर |
| २ | रायगड(१) | ९ | सुधागड |
| ३ | सिंधुदुर्ग(१) | १० | वैभववाडी |
| ४ | नाशिक(८) | ११ | सुरगणा |
| | | १२ | त्र्यंबकेश्वर |
| | | १३ | पेठ |
| | | १४ | इगतपुरी |
| | | १५ | कळवण |
| | | १६ | दिंडोरी |
| | | १७ | बागलाण |
| | | १८ | नांदगाव |
| ५ | धुळे(४) | १९ | शिरपूर |
| | | २० | साक्री |
| | | २१ | धुळे |
| | | २२ | सिंदखेडा |
| ६ | नंदूरबार(६) | २३ | अक्कलकुआ |
| | | २४ | अक्राणी |
| | | २५ | तळोदा |
| | | २६ | नवापूर |
| | | २७ | नदूरबार |
| | | २८ | शहादा |
| ७ | जळगाव(७) | २९ | चाळीसगाव |
| | | ३० | चोपडा |
| | | ३१ | जामनर |
| | | ३२ | बोदवड |
| | | ३३ | मुक्ताईनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३४ | अंमळनेर |
| | | ३५ | एरंडोल |
| ८ | जालना (८) | ३६ | परतूर |
| | | ३७ | बदनापूर |
| | | ३८ | जालना |
| | | ३९ | घनसावंगी |
| | | ४० | अंबड |
| | | ४१ | भोकरदन |
| | | ४२ | मठा |
| | | ४३ | जाफ्राबाद |
| ९ | परभणी (९) | ४४ | मानवत |
| | | ४५ | सेलू |
| | | ४६ | पाथरी |
| | | ४७ | जिंतूर |
| | | ४८ | परभणी |
| | | ४९ | पूर्णा |
| | | ५० | गंगाखेड |
| | | ५१ | सोनपेठ |
| | | ५२ | पालम |
| १० | हिंगोली (३) | ५३ | हिंगोली |
| | | ५४ | सेनगाव |
| | | ५५ | औढा नागनाथ |
| ११ | बीड (१) | ५६ | वडवणी |
| १२ | नांदेड (९) | ५७ | उमरी |
| | | ५८ | धर्माबाद |
| | | ५९ | हिमायतनगर |
| | | ६० | बिलोली |
| | | ६१ | मुदखेड |
| | | ६२ | किनवट |
| | | ६३ | देगलूर |
| | | ६४ | लोहा |
| | | ६५ | भोकर |
| १३ | बुलढाणा (७) | ६६ | लोणार |
| | | ६७ | सिंदखेड राजा |
| | | ६८ | जळगाव जामोद |
| | | ६९ | चिखली |
| | | ७० | दऊळगाव राजा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७१ | मेहकर |
| | | ७२ | सग्रामपूर |
| १४ | अकोला (१) | ७३ | पातूर |
| १५ | वाशिम (४) | ७४ | मालेगाव |
| | | ७५ | रिसोड |
| | | ७६ | मानोरा |
| | | ७७ | वाशिम |
| १६ | अमरावती (२) | ७८ | चिखलदरा |
| | | ७९ | धारणी |
| १७ | यवतमाळ (९) | ८० | पुसद |
| | | ८१ | झरी जामणी |
| | | ८२ | उमरखेड |
| | | ८३ | आर्णी |
| | | ८४ | महागाव |
| | | ८५ | घाटंजी |
| | | ८६ | केळापूर |
| | | ८७ | मारेगाव |
| | | ८८ | कळब |
| १८ | नागपूर (२) | ८९ | काटोल |
| | | ९० | रामटेक |
| १९ | भंडारा (५) | ९१ | लाखादूर |
| | | ९२ | मोहाडी |
| | | ९३ | तुमसर |
| | | ९४ | लाखनी |
| | | ९५ | साकोली |
| २० | गोंदिया (८) | ९६ | सालेकसा |
| | | ९७ | देवरी |
| | | ९८ | सडक - अर्जुनी |
| | | ९९ | गोरेगाव |
| | | १०० | गोंदिया |
| | | १०१ | अर्जुनी - मोरगाव |
| | | १०२ | तिरोडा |
| | | १०३ | आमगाव |
| २१ | चंद्रपूर (११) | १०४ | जिवती |
| | | १०५ | सावली |
| | | १०६ | पोंभूर्णा |
| | | १०७ | गोंडपिंपरी |